दिः 03 मार्च 2014

# बिहारला विशेष राज्याचा दर्जा

**-अरुण जेटली**

विरोधी पक्षेनेते (राज्यसभा)

देशाच्या पूर्व भागात असे अनेक राज्य आहेत, ज्यांनी अन्य राज्याच्या तुलनेत आर्थिक दृष्टीने प्रगति केली नाही. या राज्यात नैसर्गिक संसाधनांच्या कमतरतेमुळे त्यांना त्रास झेलावा लागला आहे. त्यांचे संसाधन मिळविण्याचे काम अजुनही अपर्याप्त स्वरुपात आहे. हेच कारण आहे की हे राज्य विशेष राज्याचा दर्जा मिळण्याची अपेक्षा ठेवते ज्यामुळे त्यांना अधिक केंद्रीय महसुल आणि अनुदान मिळेल. बिहार एक असे राज्य आहे जे विशेष राज्याच्या दर्जाची मागणी करते. मूळ बिहार, बिहार आणि झारखंड यांच्यादरम्यान वाटले गेल्याने नैसर्गिक संसाधने झारखंडकडे गेलीत. बिहार मध्ये या काही वर्षात एनडीए सरकारने अनेकदा बिहारला विशेष दर्जा मिळण्याबाबत मागणी केली. बिहारच्या राजकीय पक्षांदरम्यान या मुद्द्यावर जवळपास सर्वसंमती झाली होती. कॉंग्रेसची मागील दोन वर्षात जद(यू) वर कृपा सुरु झाली होती त्यामुळे त्यांनी सांगितले की बिहारला विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या मुद्द्यावर विचार करण्यास तयार आहोत. 2013 रोजी सामान्य अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी संकेत दिले की सरकार बिहारला विशेष राज्याचा दर्जा देण्याविषयी विचार करण्यासाठी एक समिती गठित करील. हे आश्वासन बिहारच्या आर्थिक आवश्यकतेपेक्षा राजनैतिक अधिक वाटत होते. युपिएचा इरादा जद(यू) ला गाजर दाखविण्याइतपत होता की बिहारला विशेष राज्याचा दर्जा मिळणारच आहे. मला माहित नाही की जद(यू) चे बुद्धिमान नेतृत्त्व त्यांच्या मायाजाळ्यात कितपत आले. योगायोग असा की विशेष राज्याचा दर्जा देण्याचा संकेत अशा वेळी देण्यात आला होता जेव्हा जद(यू) आणि भाजपात कडवडपणा आला होता. जेव्हा जद(यू) वेगळी झाली तेव्हा विशेष दर्जा देण्याची गोष्ट आली नाही. तसेच आरजेडी आणि जद(यू) यांच्यादरम्यानच्या स्वयंवरात कॉंग्रेस पक्षाने आपल्या जुन्या सहयोगी सोबत जाणेच उचित समजले. तथापि वर्तमानपत्रात प्रकाशीत बातम्यांमध्ये संकेत दिले गेले की आरजेडी आणि कॉंग्रेस यांच्यादरम्यान जागांच्या वाटपावरुन अडचणी निर्माण झाल्या आहेत. जद(यू) ने विशेष राज्याच्या दर्जाची मागणी करत आंदोल आयोजित केले. मिडीया ने असेही संकेत दिले की जद(यू) कॉंग्रेससोबत युती कायम करण्याविषयी सुद्धा प्रयत्न करु शकते, ज्या पक्षाने विशेष राज्याच्या दर्जाच्या मुद्द्यावर आधीच धोका दिला आहे.